
उजेड एकुलत्या मेणबत्तीचा



लेखक: एच.एच. कार्डीगन

चित्रे: सेड्रिक ल्युकास

मराठी: वंदना पलसाने

उजेड एकुलत्या मेणबत्तीचा



लेखक: एच.एच. कार्डीगन

चित्रे: सेड्रिक ल्युकास

मराठी: वंदना पलसाने





१७६१ साली, मासाचूसेट्स मधील बोस्टन शहरामध्ये चालू असलेल्या एका लिलावात एक छोटीशी मुलगी विकली गेली. ती फक्त ७ वर्षांची होती. नुकतीच ती आपल्या आफ्रिकेतील घरातून आणली गेली होती. तिथून तिला गुलाम म्हणून विकले गेले होते.

त्या वेळी बोस्टनच्या त्या गोदीवर उपस्थित असलेल्या लोकांना सुतराम कल्पना असण्याची शक्यता नव्हती, की ही आजारलेली, निस्तेज लहान मुलगी एके दिवशी अमेरिकेची पहिली आफ्रिकन-अमेरिकन कवियत्री म्हणून नावारूपाला येईल.

या लहान मुलीचे नाव फिलीस होते. ज्या गुलामवाहू जहाजाने तिला आफ्रिकेतून आणले होते, त्याच जहाजाचे नाव तिला देण्यात आले होते. अमेरिकेत गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात येऊन १०० वर्षे झाली होती. फिलीस बोस्टनला आली तोपर्यंत अमेरिकेतील गुलामांची संख्या तिथे वास्तव्याला असलेल्या वसाहतवासींच्या बरोबरीने होती.

जेव्हा फिलीस बोस्टनमधील त्या गोदीवर एकटी, घाबरलेली, कुणा अनोळखी व्यक्तीला विकले जाण्याची वाट पहात उभी होती, तेव्हा तिला हे काहीच माहीत नव्हते.





ज्या बाईंनी फिलीसला विकत घेतले, त्या तिचे आयुष्य कायमचे बदलून टाकण्यास कारणीभूत ठरणार होत्या.

मिसेस सुझाना व्हिटली यांचे वय वाढत चालले होते. त्यांना आपली काळजी घेण्यासाठी आणि सोबतीसाठी एखाद्या वयाने लहान व्यक्तीची गरज होती. फिलीस त्यांना इतकी चित्तवेधक वाटली की हिला संधी देणे योग्य ठरेल, हा विचार करून त्यांनी फिलीसला तिथल्या तिथे विकत घेतले.

मिसेस व्हिटलीना फिलीस घरात काम करण्यासाठी गुलाम म्हणून हवी होती. म्हणून या मुलीला अंघोळ घालून नवे कपडे देण्यात आले. एखाद्या बड्या, प्रतिष्ठित घराला व्यवस्थित ठेवायला ज्या प्रकारची निरंतर कामे करावी लागतात, त्यांचे प्रशिक्षण फिलीसला दिले गेले. पण, तिच्यासाठी ही कंटाळवाणी कामे लवकरच कायमची संपणार होती.



फिलीसच्या बुद्धीमत्तेमुळे तिचे आयुष्य बदलले. अमेरिकेत आल्यापासून फक्त १६ महिन्यात, छोटी फिलीस न केवळ इंग्रजी बोलायला शिकली, ती इंग्रजी वाचू पण लागली! आपण अशा काळाबद्दल बोलत आहोत जेव्हा बहुतेक स्त्रिया वाचू किंवा लिहू शकत नव्हत्या. आणि एका गुलामासाठी तर या गोष्टी करणे कल्पनेच्या पलीकडचे होते.




फिलीसचे इंग्रजीतील कौशल्य पाहून मिसेस व्हिटली प्रसन्न झाल्या. पहिल्यापासून, त्यांना फिलीस मध्ये "असामान्य बुद्धीमत्ते" ची चमक दिसली होती. वेळोवेळी फिलीस कोळश्याच्या तुकड्याने भिंतीवर अक्षरे गिरवत बसलेली दिसे.


लवकरच, मिसेस व्हिटली यांनी फिलीसला जड कामे देणे बंद केले. तेव्हा पासून, फिलीसकडे निव्वळ घरगुलाम म्हणून पाहणे बंद झाले. अर्थात, तरी ती मुक्त नव्हती.



त्या काळी, इतर काही घरांमधून जर कुणा गुलामाने अशी प्रतिभा दाखवली असती तर तिला गंभीर शिक्षा दिली गेली असती. परंतु, फिलीस मिसेस व्हिटलींची आवडती बनली. फिलीस नऊ वर्षांची झाल्यावर तिला एक शिक्षिका दिली गेली - मिसेस व्हिटली यांची स्वत:ची १८ वर्षांची मुलगी, मेरी. फिलीस प्रमाणेच, मेरी सुद्‌धा बरेचदा आजारी असे. त्यांचे छान जमले.



१२ वर्षांची होता होता, फिलीसला लॅटिन समजू लागले आणि ती कविता लिहू लागली. तिच्या लिखाणाने मिसेस व्हिटली इतक्या आनंदित झाल्या की त्यांनी फिलीसला रोज रात्री एक मेणबत्ती वापरायची परवानगी दिली. हे तर स्वत:साठी एक कार्यालय असण्यासारखे होते. तिला हवे तेव्हा उठून ती काम करू शकत होती. ती लिहील तेव्हा तिला अत्याधिक थंडी वाजू नये म्हणून तिच्या खोलीला गरम ठेवणारी आग सुद्‌धा रात्रभर पेटती ठेवली जायची. रोज सकाळी न्याहारीच्या वेळी फिलीस आपल्या कविता मिसेस व्हिटली यांना दाखवत असे.



व्हिटली कुटुंबिय बोस्टन मधील महत्वाचे लोक होते. लवकरच त्यांनी फिलीसच्या कविता घरी आलेल्या पाहुण्यांना दाखवायला सुरुवात केली. यातील काही पाहुणे प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित लोक होते. जॉन हॅनकॉक, ज्यांनी नंतर अमेरिकन स्वातंत्र्याच्या घोषणापत्रावर सही केली, त्यापैकी एक होते. एक पाहुणे मासाचूसेट्स वसाहतीचे राज्यपाल होते. या लोकांना फिलीसला पाहून आनंद आणि आश्चर्य वाटले. आपल्या कविता वाचताना फिलीस कधीच घाबरायची नाही. कधीतरी पाहुणे तिला तपकिरी कागदात गुंडाळून पुस्तके भेट देत - त्या काळी ही बहुमुल्य भेट होती.



ज्या क्षणापासून मिसेस व्हिटली यांना फिलीस हुशार असल्याची जाणीव झाली होती, तेव्हापासून त्यांनी फिलीसला इतर गुलामांमध्ये मिसळू दिले नव्हते. आपल्या संपूर्ण बालपणात, फिलीसला फक्त एकच आफ्रिकन-अमेरिकन मैत्रिण होती. ती सुद्धा गुलाम होती. तिचे नाव होते ओबुर टॅनर. फिलीस ओबुरला न्युपोर्ट, ऱ्होड आयलंड येथे भेटली. व्हिटली कुटुंब इथे आपल्या सुट्ट्या घालवत. फिलीस आजारी असेल तेव्हा ते तिला या ठिकाणी पाठवत असत.




फिलीससाठी हे सर्व निश्चितच अतिशय विचित्र असणार. जरी आपल्याला तिच्या ओबुर टॅनर सोबतच्या मैत्री बद्दल फारसे माहित नसले, तरी आपल्याला इतके माहित आहे की फिलीसला कोणत्याही प्रकारचे फार काम करण्याची परवानगी नव्हती. आणि तरी ती गुलाम तर होतीच. हवे तसे करण्याची तिला मुभा नव्हती. एक प्रकारे, ती एखाद्या बंदिवान गाणाऱ्या पक्ष्याप्रमाणे होती. फिलीस व्हिटली कुटुंबाची संपत्ती होती. त्यांनी तिला आपले आडनाव सुद्धा दिले होते.



फिलीस व्हिटलीचे बरेच लिखाण धर्मासंबंधी होते. परंतु, तिने, अशा देशामध्ये गुलाम असणे म्हणजे काय असते, जो देश स्वत:च्या स्वातंत्र्याची लढाई लढत आहे, यावरही लिहिले.

१७७० चे दशक येता येता, अमेरिकनांना ब्रिटीश सत्ताधारी म्हणून नको होते. त्यांना स्वत:चे शासन हवे होते.

अमेरिकन क्रांती सुरु होण्याआधीच, फिलीस व्हिटलीने स्वत:चे स्वातंत्र्य मिळवले.



१७७३ मध्ये व्हिटली कुटुंबाने फिलीसला मुक्त केले. फिलीस इंग्लंडला गेली. तिथे तिने आपले पहिले कवितांचे पुस्तक प्रकाशित केले. तेव्हा ती फक्त २० वर्षांची होती.

“Poems on Various Subjects, Religious and Moral” (विविध विषयांवरील कविता, धार्मिक आणि नैतिक), कवियत्री फिलीस व्हिटली; हे आफ्रिकन-अमेरिकन व्यक्तीने लिहिलेले पहिले पुस्तक होते. तसेच, अमेरिकेतील कुणाही स्त्रीने प्रकाशित केलेले ते केवळ दुसरे पुस्तक होते.



फिलीस व्हिटलीने जे केले ते विस्मयजनक तर होतेच पण महत्वाचे सुद्‌धा होते. तिचे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर, पहिल्यांदा लोकांना गुलामगिरीत अडकलेल्या आफ्रिकन-अमेरिकन व्यक्तीच्या कविता वाचायला मिळाल्या. गुलामाच्या नजरेतून गुलामगिरीचे दर्शन हा अनेक अमेरिकन लोकांसाठी महत्वाचा धडा होता.



एक अमेरिकन, जे फिलीस व्हिटलीला ओळखत होते आणि ज्यांना तिचे लिखाण आवडत होते, ते होते जॉर्ज वाशिंग्टन. ती अमेरिकेला परतल्यानंतर, जेव्हा अमेरिकन क्रांती सुरु झाली, फिलीसने वाशिंग्टन यांना पत्र लिहिले. वाशिंग्टन यांनी त्या पत्राला उत्तर दिले. त्यांना तिला भेटायचे होते.

ही भेट प्रत्यक्षात झाली की नाही हे कुणालाच माहित नाही. एक मात्र नक्की! जी व्यक्ती अमेरिकेची पहिली राष्ट्राध्यक्ष होणार होती, तिला फिलीसबद्दल आदर होता, तिने जे काही केले त्याबद्दल - एकुलत्या मेणबत्तीच्या उजेडात!!